## रे. दि. मु. क्र. ०८/२०१७ केशव व इतर विरूध्द कृष्णा व इतर मधील नि. क्र. ५ वरील आदेश.

०१.     वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादींनी वादींच्या दावा मिळकतीवरील शांततामय वहिवाटीस हरकत, अडथळा करू नये व दावा मिळकतीचे हस्तांतरण करू नये म्हणून मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२.     **अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे.**

प्रस्तुतचा दावा जाहिर ठराव व मनाई हुकूमासाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुतचा दावा हा मौजे नरवणे, तालुका — माण, जिल्हा — सातारा येथील शेती मिळकती गट क्रमांक ११६ क्षेत्र ७ हेक्टर ३८ आर, गट क्रमांक १५१ क्षेत्र ५ हेक्टर १.३६ आर, गट क्रमांक १४९ क्षेत्र ४ हेक्टर १३ आर, गट क्रमांक १२७ क्षेत्र ० हेक्टर ७३ आर या सर्व मिळकतीमधील प्रत्येकी आठ आणे हिश्याबाबत दाखल केलेला आहे. प्रस्तुत मिळकतींचा उल्लेख येथून पुढे 'दावा मिळकती' अशा करणेत आलेल्या आहेत.

०३.     वादी व प्रतिवादी यांच्यात वाटपाबाबत स्पे. दि. दावा क्रमांक ०८/१९६७ दाखल झाला होता. तो मंजूर झाल्यानंतर त्यातील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी स्पे. दरखास्त क्रमांक २४/१९७३ दाखल झाली होती. प्रस्तुत दावा व दरखास्त मधील आदेशाप्रमाणे प्रतिवादी क्र. १ यास दावा मिळकतीत प्रत्येकी आठ आणे हिस्सा देण्यात आला होता. परंतु, बेकायदेशीरपणे दावा मिळकती गट क्रमांक ११६ व १५१ मध्ये प्रतिवादी क्र. १ च्या नावाची संपूर्ण १६ आणे हिश्याला नोंद झालेली आहे. असे असले तरी वादीचा गट क्रमांक ११६ मध्ये पूर्वेकडील दक्षिणोत्तर आठ आणे क्षेत्रावर व गट क्रमांक १५१ मध्ये पश्चिमेकडील आठ आणे क्षेत्रावर व गट क्रमांक १४९ व १२७ मध्ये उत्तरेकडील प्रत्येकी आठ आणे क्षेत्रावर कब्जा व वहिवाट आहे. दावा मिळकतीत वादीचे शेत घर व गोठा आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक १ च्या नावे दावा मिळकत गट क्रमांक ११६ व १५१ बाबत झालेली कब्जे पट्टी ही बेकायदेशीर आहे कारण त्या कब्जे

पट्टीप्रमाणे प्रतिवादी क्रमांक १ च्या नावे प्रस्तुतच्या दोन्ही मिळकतींपैकी संपूर्ण क्षेत्र करण्यात आले.

०४. प्राप्त परिस्थितीत प्रतिवादी क्रमांक १ ने प्रतिवादी क्रमांक २ च्या नावे दावा मिळकतीपैकी आठ आणे क्षेत्र केलेले आहे. वास्तविक प्रतिवादी क्रमांक १ हा लक्ष्मण वैदय याचा दत्तक पुत्र आहे. तर प्रतिवादी क्रमांक १ व २ हे नैर्सगिक भाउ आहेत. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्रमांक २ चा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नसताना प्रतिवादी क्रमांक १ ने बेकायदेशीरपणे त्याच्या नावावर दावा मिळकत केलेली आहे. पुढे प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी दिनांक २३.१२.२००४ रोजी दस्त क्रमांक २५५०/२००४ प्रमाणे दावा मिळकत गट क्रमांक ११६ ही बेकायदेशीरपणे प्रतिवादी क्रमांक ३ ते ८ यांना विक्री केली आहे. असे असले तरीही दावा मिळकतीपैकी आठ आणे क्षेत्रावर वादींचाच कब्जा व वहिवाट आहे. प्रतिवादी हे वादींच्या दावा मिळकतीवरील कब्जे वहिवाटीस हरकत, अडथळा करत असतात. तसेच, त्रयस्त इसमांना दावा मिळकत विक्री करण्याच्या विचारात आहेत. सबब, प्रतिवादींनी दावा मिळकतीचे प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपर्यंत कोणत्याही मार्गाने हस्तांतरण करू नये, तसेच दावा मिळकतीवरील वादींच्या शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत, अडथळा करू नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम देणेत यावा.

०५. प्रतिवादी क्रमांक ४ ते ८ यांनी प्रस्तुत अर्जावरील आपले म्हणणे नि. क्र.४० वर दाखल केलेले आहे. प्रस्तुत प्रतिवादीचे महत्वपूर्ण कथन असे आहे की, त्यांनी दावा मिळकत गट क्र. ११६ संपूर्ण क्षेत्र प्रतिवादी क्रमांक १ व २ कडून खरेदी केले असून प्रस्तुत मिळकतीवर त्यांची मालकी व कब्जा आहे. त्यांनी कथन केले की, वादींनी प्रस्तुत अर्जाद्वारे दाव्यात मागणी केलेली अंतिम दादीची मागणी केलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. त्याचप्रमाणे वादींनी दावा मिळकतीवर प्रतिवादींची कब्जे वहिवाट आहे ही बाब लपवून ठेवलेली आहे. त्याचप्रमाणे प्रस्तुतचा दावा मुदतबाहय झालेला आहे. त्यामुळे दावा रद्द होणेस पात्र आहे.

०६. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, दावा मिळकतीवर वादींची

कब्जे वहिवाट नाही. पूर्वी दावा मिळकतीवर प्रतिवादी क्रमांक १ व २ यांची कब्जे वहिवाट होती. दावा मिळकतीचे प्रतिवादी क्रमांक ४ ते ८ यांनी प्रतिवादी क्रमांक १ व २ यांच्या कडून दिनांक २३.१२.२००४ रोजी नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी केलेली आहे. तेव्हापासून दावा मिळकत प्रतिवादी क्रमांक ४ ते ८ यांच्या कब्जे वहिवाटीत आहेत. प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये एक विहीर, चार बोरवेल घेतलेले आहेत. मोठया प्रमाणावर खर्च करून दावा मिळकतीची सुधारणा केलेली आहे त्याचप्रमाणे दावा मिळकतीची मोजणी केलेली आहे. दावा मिळकतीमध्ये पाईप लाईन केलेली आहेत व इलेक्ट्रीक मोटार बसविलेली आहे. दावा मिळकतीवर प्रतिवादींचा गोठा आहे. प्रतिवादी हे दावा मिळकतीचे प्रमाणीक खरेदीदार, (Bonafide purchaser for value without notice), आहेत. प्रतिवादींनी कधीही दावा मिळकत विक्री करण्याचा प्रयत्न केलेला नाही. तसेच, दावा मिळकतीवर प्रतिवादींचा कब्जा असल्याने प्रतिवादींनी दावा मिळकतीवरील वादींच्या कब्जे वहिवाटीस हरकत करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. सबब, अर्ज रद्द करणेत यावा.

०७. प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी नि.क्र.३७ वर पुरशिस देवून प्रतिवादी क्रमांक ४ ते ८ यांचे म्हणणे स्विकारलेले आहे. प्रतिवादी क्र.३ ने प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दिलेले नाही.

०८. वादी व प्रतिवादी यांच्या कथनावरून खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींना प्रथमदर्शनी केस आहे काय ? | अंशत: होकारार्थी. |
| २. | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय ? | अंशत: होकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ३. | मागणीप्रमाणे मनाई हुकूम न दिलेस वादींचे येणारे नुकसान होणार आहे काय ? | न भरून अंशत: होकारार्थी. |
| ४. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत.</u>

०९. सदरचे मुद्दे एकमेकाशी निगडीत असल्याने ते विवेचनासाठी एकत्रित घेणेत आलेले आहेत.

१०. वादीतर्फे विद्वान वकील श्री. मदने यांनी आपला लेखी युक्तिवाद नि. क्र.६० वर तर प्रतिवादींच्या लेखी युक्तिवादाचा उत्तरादाखल लेखी युक्तिवाद नि.क्र. ७४ वर दाखल केलेला आहे. त्यांनी आपल्या लेखी युक्तिवादांमध्ये अर्जातील मुद्दे कथन केलेले आहेत. त्यांनी पुढे असे देखील कथन केले की, अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांवरून प्रतिवादी क्रमांक २ चा दावा मिळकतीशी काही संबंध नाही. तसेच, दावा मिळकतीबाबत झालेली कब्जेपट्टी व प्रतिवादी क्रमांक ३ ते ८ यांच्या लाभात नोंदविलेले खरेदीखत बेकायदेशीर आहे, ही बाब स्पष्ट होते. त्याचप्रमाणे केवळ महसुल अभिलेखातील नोंदीवरून प्रतिवादी क्रमांक २ यास मालकी प्राप्त होवू शकत नाही. त्यामुळे देखील दावा मिळकतीबाबत त्याने केलेले व्यवहार बेकायदेशीर आहेत, ही बाब स्पष्ट होते. दावा मिळकतीवर वादींचा कब्जा आहे, ही बाब वादीचे साक्षीदार संजय नामदेव राजेमाने व फोटोग्राफर दत्तात्रय हणमंत काशिद यांच्या प्रतिज्ञापत्रातून स्पष्ट होते. त्याचप्रमाणे दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी हे कुळ हक्क आहेत, मालकी हक्क नाहीत. त्यामुळे देखील प्रतिवादींना दावा मिळकतीबाबत कोणतेही व्यवहार करण्याचा हक्क नव्हता. दावा मिळकत पूर्वीपासून वादींच्या कब्जात आहेत. त्यात त्यांची शेत, घर व झाडे आहेत. त्याबाबत नोंदी झालेल्या आहेत. प्रतिवादी क्रमांक २ चा दावा मिळकतीबाबत हक्क असलेबाबत कोणताही पुरावा प्रतिवादींनी दिलेला नाही. प्रतिवादींनी नमूद केलेल्या मोजणीबाबत वादींना कधीही नोटीस नव्हती. या बाबीचा

विचार करून अर्ज मंजूर करणेत यावा.

११. प्रतिवादी क्रमांक ४ ते ८ चे विद्वान वकील श्री. सी. पी. कुलकर्णी यांनी आपला लेखी युक्तिवाद नि.क्र.६६ वर दाखल केलेला आहे. त्यांनी आपल्या म्हणण्यातील कथने आपल्या लेखी युक्तिवादात नमूद केलेले आहेत. त्यांनी पुढे कथन केले की, प्रतिवादी यांच्या दावा मिळकतीवरील नोंदी बाबत वादींनी कोठेही तक्रार केलेली नाही. ग्रामपंचायतीचे उतारे व कराच्या पावत्या यावरून दावा मिळकतीवर प्रतिवादींची कब्जे वहिवाट आहे, ही बाब स्पष्ट होते. त्याचप्रमाणे दावा मिळकतीत कोर्ट कमिशन झाले, त्याबाबत वादींनी हरकत घेतली नाही. यावरून देखील दावा मिळकतीवर प्रतिवादींची कब्जे वहिवाट आहे, ही बाब स्पष्ट होते. दावा मिळकती, कुळ मिळकती आहेत, असे कथन वादींनी वादपत्रात केलेले आहे. त्यामुळे त्यांना प्रस्तुत कथन आपले युक्तिवादात करता येणार नाही. तसेच, कुळ मालकाचे हक्क दावा मिळकतीबाबत संपुष्टात आलेले आहेत. अशा परिस्थितीत दावा मिळकतीवरील प्रतिवादींची कब्जे वहिवाट सिध्द झालेली आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा.

१२. प्रतिवादी क्रमांक १ व २ यांचे विद्वान वकील श्री. के. डी. भोसले यांनी देखील प्रतिवादी क्रमांक ४ ते ८ च्या कथनाप्रमाणे युक्तिवाद केलेला आहे.

१३. वादींनी आपला भर नरवणे येथील गट क्रमांक वाडी विभाजन तक्त्यावर दिलेला आहे. याप्रमाणे गट क्रमांक ६११ चा नवीन गट क्रमांक ११६ झाला, असे नमूद केले आहे. यावरून दावा मिळकत ११६ चा जुना गट क्रमांक ६११ होता, ही बाब स्पष्ट होते. त्याचप्रमाणे त्यांनी आपला भर नकाशावर दिलेला आहे. याप्रमाणे गट क्रमांक ११६ च्या उत्तरेला गट क्रमांक १४९, पश्चिमेला गट क्रमांक १६५, पूर्वेला गट क्रमांक ११५ तर दक्षिणेला १२२ चा काही भाग, तसेच गट क्रमांक ११७, १०३, १०४ असल्याचे दिसून येते. गट क्रमांक १४४ हा गट क्रमांक १६५ च्या पश्चिमेला असल्याचे दिसून येते.

१४. वादींनी आपला भर आदित्य फोटोज, नरवणे यांचे बील व एकूण

सात फोटो यावर दिलेला आहे. यावरून घर मिळकत, शेड, शेत जमिनी, पीक, पाण्याची टाकी या बाबी असल्याचे दिसून येते.

१५. वादींनी स्पे. दरखास्त क्रमांक २४/१९७३ मधील आत्माराम उर्फ साधू करे व श्रीरंग गोविंद जाधव यांचा अर्ज व प्रतिज्ञालेख दाखल केलेला आहे. त्यावेळी कब्जे पट्टीबाबत तक्रार उपस्थित केलेबाबत या अर्ज व प्रतिज्ञापत्रावरून दिसून येते. परंतु, तेव्हाच्या अर्जावर कोणताही अंतिम आदेश पारित झाल्याचे दिसून येते नाही. त्यामुळे केवळ अर्ज दाखल केला होता, यावरून पक्षकारांचे या प्रकरणातील हक्क ठरविता येणार नाहीत.

१६. वादीतर्फे साक्षीदार दत्तात्रय हणमंत काशिद यांचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आलेले आहे. त्यांनी आपल्या प्रतिज्ञापत्रात नमूद केलेले आहे की, त्याचा फोटोग्राफीचा व्यवसाय असून त्यांनी प्रस्तुत प्रकरणातील फोटो काढलेले आहेत. फोटो काढण्याकरीता ते गट क्रमांक ११६, १४९, १५१, १२७ या ठिकाणी गेले होते व त्या ठिकाणच्या प्रत्यक्ष परिस्थितीचा त्यांनी फोटो काढलेले आहेत. वादीने आपले कथन सिध्द करण्याकरीता साक्षीदार क्र. १ संजय नामदेव राजेमाने यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यांनी कथन केले आहे की, दावा मिळकतीवर वादींची वहिवाट आहे व ते दावा मिळकतीमध्ये वेगवेगळी पिके घेत असतात. दावा मिळकतीत वादींचे शेत घर आहे. तसेच, झाडे आहेत. प्रतिवादींची दावा मिळकतीमध्ये कधीही कब्जे वहिवाट नव्हती. सदर संजय राजेमाने यांची मिळकत गट क्र.११५ मध्ये आहे हे दर्शविण्याकरीता त्याचा मिळकतीचा उतारा दाखल केला आहे.

१७. वादी तर्फे दावा मिळकतीचा सात बाराचा उतारा दाखल करण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे दावा मिळकत गट क्रमांक ११६ वर प्रतिवादी आकाश काळे, गहिनीनाथ काळे, प्रकाश महानवर, काशिनाथ महानवर यांची प्रत्येकी चार आणे हिश्यास मालकी व वहिवाट असल्याचे दिसून येते. गट क्रमांक १५१ च्या सात बाराच्या उता—यावरून केशव वैदय व प्रमोद लाड यांची मालकी व वहिवाट असल्याचे दिसून येते. गट क्रमांक १४९ च्या सात बाराच्या उता—यावरून केशव

वैदय आठ आणे, प्रमोद लाड चार आणे, कृष्णा वैदय चार आणे अशी मालकी वहिवाट असल्याचे दिसून येते. या ठिकाणी नमूद करणे अत्यंत आवश्यक आहे की, प्रस्तुत गट क्रमांक ११६, १५१ व १४९ या तिन्ही मिळकतीच्या सात बाराच्या उता—यांवर फार दिवसांचे वहिवाटदार कुळ अशी नोंद असल्याचे नमूद आहे. गट क्रमांक १२७ च्या सात बाराच्या उता—यावरून असे दिसून येते की, सदर मिळकती देवस्थानच्या मालकीच्या असून त्यामध्ये केशव वैदय, कृष्णा वैदय हे कुळ म्हणून इतर हक्कात नोंद असल्याचे दिसून येते.

१८. नि. दि. दा. क्र. १०/१९६३ च्या वादपत्राची प्रमाणित प्रत वादींनी अभिलेखावर दाखल केलेली आहे. यावरून असे दिसून येते की, कृष्णाजी लक्ष्मण वैदय म्हणजे या प्रकरणातील प्रतिवादी याने या प्रकरणातील वादी केशव व नारायण यांचे पूर्वज दत्तात्रय वैदय यांच्या विरूध्द तो दावा अनेक मिळकतींचे वाटप होवून मिळणेसाठी व इतर दादींसाठी दाखल केला होता. त्या दाव्यातील हुकूमनाम्याची प्रमाणित प्रत देखील अभिलेखावर दाखल करणेत आलेली आहे. यावरून असे दिसून येते की, त्या दाव्यात नमूद असलेल्या दावा मिळकतींची वाटपाची मागणी मंजूर करण्यात आली होती व त्यातील वादी व प्रतिवादी यांना वेगवेगळया मिळकतींमध्ये वेगवेगळे हिस्से बहाल करणेत आले होते. त्या दाव्याच्या अंमलबजावणी साठी दाखल झालेली स्पे. दरखास्त क्रमांक २४/१९७३ च्या अर्जाची प्रत देखील अभिलेखावर दाखल आहे. त्याचप्रमाणे वाटपासाठी दरखास्त जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविणेत आल्याचे दिसून येते.

१९. प्रतिवादींनी आपले कथन सिध्द करण्याकरीता एकूण अठरा फोटो, या फोटोबाबत फोटोग्राफर आदित्य फोटोज यांचे बील दाखल केलेले आहे. या फोटोवरून घर मिळकत, गोठा, शेत मिळकती, विहीरी, मोटार विदयूत कनेक्शन, शेतातील पिके व पाईप लाईन असल्याचे दिसून येते.

२०. प्रतिवादींनी ग्रामपंचायत नमुना नंबर ८ चे उतारे दाखल केलेले आहेत. यावरून मालमत्ता क्रमांक ११९० हा गट क्रमांक ११६ शी संबंधीत असून त्यावर आकाश जयराम काळे अ.पा.क. जयराम यांची कब्जे वहिवाट असून त्या ठिकाणी

लोखंडी पत्र्याचे शेड असल्याचे दिसून येते. तसेच, मिळकत क्रमांक ११९१ वर काशिनाथ गुलाब महानवर अ.पा.क. गुलाब यांची लोखंडी पत्र्याचे घरावर मालकी वहिवाट असून ही मिळकत गट क्रमांक ११६ शी संबंधीत असल्याचे दिसून येते.

२१. प्रतिवादींनी आपले कथन सिध्द करण्याकरीता कराच्या पावत्यावर भर दिलेला असून त्याप्रमाणे सन २०१७—२०१८ करीता घर क्रमांक ११९० करीता आकाश काळे यांनी व घर क्रमांक ११९१ करीता काशिनाथ महानवर यांनी कर भरल्याचे दिसून येते.

२२. प्रतिवादींनी संतोष गुलाब महानवर यांचे नावावरील सन २०१६ सालातील, प्रकाश भागवत महानवर यांच्या नावावरील मार्च, २०११ सालातील जयराम किसन काळे यांच्या नावावरील जुन, २०१४ मधील काशिनाथ गुलाब महानवर यांचे नावावरील जुन, २०१६ मधील लाईट बीले दाखल केली आहेत. त्याचप्रमाणे जयराम काळे, प्रकाश महानवर, संतोष महानवर यांना विदयूत कनेक्शन मिळणेबाबत केलेल्या स्थळतपासणी अहवालाची प्रत दाखल केलेली आहे. त्याच प्रमाणे प्रकाश महानवर यांनी विदयूत कनेक्शन मिळणेसाठी केलेल्या अर्जाची प्रत दाखल केलेली आहे.

२३. प्रतिवादींनी जयराम काळे यांच्या नावावरील ए. सी. पाठक ॲन्ड कंपनी यांचे इंजिन स्पेअर पार्ट व इंजिन खरेदीचे दिनांक १६.०१.२००६ ची तिन बीले यावर आपला भर दिलेला आहे. तसेच, उपविभागीय अधिकारी यांनी दावा मिळकत संपादित करणेबाबत त्यांना दिलेल्या दिनांक ०७.०३.२०१३ रोजीच्या नोटीसच्या प्रतीवर भर दिलेला आहे.

२४. प्रतिवादींनी गुलाब भागवत महानवर यांच्या नावाचे रणजीत बोअरबोल यांचे रूपये ५००/— च्या बीलाची प्रत, तसेच देशमुख इलेक्ट्रीकल्स् दहिवडी यांची रूपये ३२,३००/— च्या बीलाची प्रत दाखल केलेली आहेत. यावरून त्यांनी विदयूत मोटार खरेदी केल्याचे दिसून येते.

२५. प्रतिवादींनी आपले कथन सिध्द करण्याकरीता त्रयस्थ इसम लक्ष्मण ज्ञानू काळे, सतिष गुलाबराव काळे, अधिकराव ज्ञानू काळे, दिलीप ज्ञानू काळे, नितीन दादा काळे यांच्या शपथपत्रावर भर दिलेला आहे. त्यांनी दावा मिळकतीवर प्रतिवादी क्रमांक ३ ते ८ यांची घरे व वहिवाट आहे, असे कथन केलेले आहे. त्याचप्रमाणे प्रस्तुत लक्ष्मण, अधिकराव, नितीन, दिलीप, यांची मिळकत गट क्रमांक १४४ मध्ये वहिवाट असलेबाबत गट क्रमांक १४४ चा उतारा दाखल केलेला आहे.

२६. प्रतिवादींनी आपला भर फेरफार क्रमांक ७६५ वर दिलेला असून त्याप्रमाणे गट क्रमांक ११६ व इतर मिळकतीत कुळ म्हणून आण्णा काटकर, कृष्णा काटकर, धोंगे काटकर, माधव काटकर यांची कुळ म्हणून नावे कमी केली अशी नोंद केलेली आहे.

२७. प्रतिवादींनी आपला भर नरवणे विविध कार्यकारी सोसायटीच्या कर्ज खाते उता—यावर दिलेला असून त्यावरून गहिनीनाथ काळे, प्रकाश महानवर, जयराम काळे, काशिनाथ महानवर हे या सोसायटीचे सभासद कर्जदार असल्याचे दिसून येते.

२८. प्रतिवादींनी दिनांक २३.१२.२००४ रोजीचे खरेदीखत दाखल केलेले आहे. यावरून प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी प्रतिवादी गहिनीनाथ, आकाश, प्रकाश व संतोष यांना दावा मिळकत गट क्रमांक ११६, संपूर्ण क्षेत्र विक्री केल्याचे दिसून येते. त्याच सोबत जोडलेल्या कब्जेपट्टीवरून असे दिसून येते की, दरखास्त क्रमांक २४/१९७३ कामी तहसिलदार यांचे मार्फत कब्जे पट्टी करण्यात आली होती. त्यास सदाशिव दत्तात्रय वैदय, केशव दत्तात्रय वैदय, लक्ष्मण दत्तात्रय वैदय, रेखा पांडुरंग सोनवडेकर, वैशाली सत्यनारायण ब्रहमे, मंगल दत्तात्रय वैदय, राधाबाई दत्तात्रय वैदय, आण्णा चंदू काटकर, दादासाो सिताराम काटकर, आत्माराम साधू करे, लक्ष्मण साधू करे, श्रीरंग गोविंद जाधव, खाशाबा गेनू काटकर, दिगंबर नारायण वैदय, धोंडीराम गोपाळ वैदय, कृष्णा बाबाजी काटकर, धोंडी खाशाबा काटकर, माधवा भजू काटकर, कृष्णा गंगाराम काटकर, माधवा मारूती काटकर, वसंत मारूती काटकर, पिराजी श्रीपती कांबळे, लाला रामा कर्णे, बंडू शंकर वैदय, बाबा तात्या काटकर हे पक्षकार होते. त्यांच्यातील ठरावाप्रमाणे या सर्वांकडून कब्जा काढून घेवून

कृष्णा लक्ष्मण वैदय, कुलमुखत्यार श्रीमती सुशिलाबाई शंकर लाड यांना वेगवेगळया जमिनीचा कब्जा देणेत आलेला आहे. त्यामध्ये गट क्रमांक ६११, क्षेत्र ६ हेक्टर ३८ आर. यांचे संपूर्ण क्षेत्र समाविष्ट आहे. या खरेदीखतासोबत फेरफार क्रमांक १४३ ची प्रत दाखल करणेत आलेली आहे. त्याप्रमाणे दत्तात्रय रघूनाथ वैदय मयत झाल्यावर त्यांचे वारस सदाशिव वैदय, केशव वैदय, लक्ष्मण वैदय, रघूनाथ वैदय, रेखा सोनवलकर, वैशाली ब्रम्हे, मंगल मोकाशी यांना हिस्सा आला असून प्रत्यक्ष कब्जा एकत्र कुटुंब कर्ते म्हणून केशव वैदय असल्याचे नमूद केले आहे. सदर फेरफार दिनांक ०५.११.१९७७ रोजीचा आहे. प्रस्तुत खरेदीखताची नोंद झाल्याबाबत दिनांक १०.०१.२००५ चा फेरफार क्रमांक १९८५ अभिलेखावर दाखल आहे.

२९. प्रतिवादींनी आपला भर मो. र. क्रमांक ३१७/२००५ च्या मोजणी नकाशावर दिलेला असून सदर नकाशा गहिनीनाथ काळे यांच्या अर्जावरून गट क्रमांक ११६ च्या मोजणीबाबत असल्याचे दिसून येते. तसेच, त्या मोजणीकामी गहिनीनाथ काळे, श्रीकृष्ण वैदय, नारायण काळे, प्रकाश महानवर, गुलाब महानवर, पांडुरंग महानवर हे हजर असल्याचे दिसून येते.

३०. वादी क्रमांक २ याने दिनांक ३०.०१.२०१७ रोजी ग्रामपंचायतीला अर्ज देवून गट क्र.११६ व १४९ मध्ये बांधलेल्या शेडची नोंद व्हावी असा अर्ज ग्रामपंचायतीला दिल्याचे दोन अर्जावरून दिसून येतो.

३१. वरीलप्रमाणे वादी व प्रतिवादी यांनी वेगवेगळी परस्पर विरोधी कागदपत्रे दाखल केली आहेत. त्या कागदपत्रांचे विश्लेषण करणे आवश्यक आहे.

३२. वादीने दाखल केलेल्या विशेष दिवाणी दावा क्रमांक १०/१९६३ चे वादपत्र, हुकूमनामा व दरखास्त क्रमांक २४/१९७३ चा अर्ज अभिलेखावर दाखल आहे. परंतु, त्यामध्ये मिळकतींचे तत्कालीन सिटी सर्वे क्रमांक नमूद करणेत आलेले आहेत. परंतु, त्या सिटी सर्वे क्रमांकाचे आज कोणते गट क्रमांक आहेत, ही बाब दर्शविणा—या कोणत्याही बाबी अभिलेखावर दाखल नाहीत. त्यामुळे प्रस्तुत कागदपत्रांवरून एकच बाब स्पष्ट होते की, यातील प्रतिवादी क्रमांक १ व वादींचे

पूर्वज दत्तात्रय व इतर यांच्यामध्ये वाटपाबाबत दावा दाखल झाला होता व त्याचा हुकूमनामा जिल्हाधिकारी यांच्याकडे अंमलबजावणीकरीता पाठविणेत आला होता.

३३. यातील वादींनी दावा मिळकतीवरील आपला कब्जा सिध्द करण्याकरीता साक्षीदार नामे संजय राजेमाने व संजय काशिद यांचे शपथपत्र व फोटो दाखल केलेले आहेत. त्या विरूध्द प्रतिवादींनी देखील साक्षीदार नामे लक्ष्मण ज्ञानू काळे, सतिष गुलाबराव काळे, अधिकराव ज्ञानू काळे, दिलीप ज्ञानू काळे, नितीन दादा काळे यांचे शपथपत्र दाखल केलेले आहेत. यावरून असे स्पष्ट होते की, वादींनी व प्रतिवादींनी आपआपली कथने सिध्द करण्याकरीता समान मुल्याचा परस्पर विरोधी पुरावा दिलेला आहे. यातील दोन्ही पुराव्यांचे वाचन केले असता परस्पर विसंगत अनुमान निर्माण होतात. त्यामुळे या पुराव्यां वरून वादी व प्रतिवादी या दोघांचीही दावा मिळकतीवरील वहिवाट सिध्द होवू शकत नाही.

३४. वादींनी दावा मिळकतीवर त्यांचे घर आहे हे दर्शविण्याकरीता घर नोंदणी होणेबाबत अर्जाची प्रत दाखल केली आहे. त्यावरून वादींचे मौजे नरवणे येथे घर असल्याचे दिसून येते. याउलट प्रतिवादींनी देखील मौजे नरवणे येथे आपले घर असल्याबाबत घर क्रमांक ११९० व ११९१ चे उतारे दाखल केलेले आहेत. यावरून या घरावर प्रतिवादींचा कब्जा असल्याचे नमूद केलेले आहे. प्रतिवादींनी आपल्या घर क्रमांकाबरोबर ही घरे गट क्रमांक ११६ मध्ये आहेत हे दर्शविण्याकरीता सदर घराच्या उता—यावर गट क्रमांक ११६ नमूद केलेचे दिसून येत आहे. परंतु, गट क्रमांकाचे क्षेत्र कोठे आहे हे दर्शविण्याची जबाबदारी ही महसुल तलाठी यांची आहे. या बाबीचा ग्रामसेवकाचा संबंध येतो असे दिसून येत नाही. त्यामुळे ग्रामसेवक यांनी या घर मिळकतींच्या उता—यावर गट क्रमांक ११६ कशाच्या आधारे लिहीले ही बाब स्पष्ट होवू शकत नाही. त्यामुळे प्रस्तुत वादी व प्रतिवादी यांनी नमूद केलेली घरे गट क्रमांक ११६ मध्ये आहेत ही बाब घर मिळकतीच्या उता—यांवरून स्पष्ट होवू शकत नाही.

३५. प्रतिवादींनी दावा मिळकतीवरील आपला कब्जा सिध्द करण्याकरीता विज बीले, विदयूत विभागाने केलेले स्थळतपासणी, तसेच विदयूत मोटार, तसेच

 

इंजिन खरेदी पावत्या यावर दिलेला आहे. परंतु, विज बीले व विदयूत अधिका—याने केलेले परिक्षण यावर कोठेही कोणत्याही मिळकतीचा गट क्रमांक नमूद केलेला नाही. त्यामुळे केवळ वीज बिल व परिक्षण अहवाल यावरून प्रतिवादींची दावा मिळकतीवरील कब्जा सिध्द होवू शकत नाही. तसेच, केवळ प्रतिवादींनी विदयूत मोटार किंवा इंजिन खरेदी केले म्हणजे ते दावा मिळकतीमध्ये स्थापित करण्यासाठीच खरेदी केले असे अनुमान काढता येणार नाही. त्यामुळे या पुराव्यावरून प्रतिवादींचा दावा मिळकतीवरील कब्जा सिध्द होवू शकत नाही.

३६. प्रतिवादीने आपला कब्जा दर्शविण्यासाठी दावा मिळकतीचा नकाशा दाखल केला आहे. त्याप्रमाणे दावा मिळकतीची मोजणी झाली होती, असे दिसून येते. परंतु, एखादया मिळकतीच्या मोजमापाकरीता मिळकतीचा कब्जा सिध्द होउ शकत नाही. प्रस्तुत नकाशा प्रतिवादीच्या कामात विचारात घेता येणार नाही.

३७. प्राप्त परिस्थितीत वादी व प्रतिवादी यांचा कब्जा दर्शविणारे महत्वपूर्ण दस्त म्हणजे कब्जे पावती व दावा मिळकतीचा सात बाराचा उतारा, या दोनच बाबी अभिलेखावर उपलब्ध आहेत.

३८. कब्जे पावती व सात बाराचा उतारा यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, कब्जे पावतीला यातील वादी केशव दत्तात्रय वैदय हे पक्षकार होते. या प्रमाणे गट क्रमांक ६११ संपूर्ण क्षेत्र प्रतिवादी क्रमांक १ कृष्णा वैदय, कुलमुखत्यार सुशिलाबाई लाड यास देण्यात आल्याचे दिसून येते. वादीने दाखल केलेल्या वाडी विभाजन तक्त्यावरून प्रस्तुतचा गट क्रमांक ६११ हा नवीन गट क्रमांक ११६ असल्याचे दिसून येते. यावरून दावा मिळकत ६११ ही संपूर्ण प्रतिवादी क्रमांक १ कृष्णा वैदय यास कब्जे पट्टीप्रमाणे देण्यात आल्याचे दिसून येते. त्याच प्रमाणे गट क्रमांक ६२८/२ ही मिळकत संपूर्णपणे प्रतिवादी क्रमांक १ कृष्णा वैदय यास देण्यात आल्याचे दिसून येते. या मिळकतीचा सध्याचा गट क्रमांक १५१ प्रस्तुत तक्त्याप्रमाणे आहे. त्याचप्रमाणे गट क्रमांक ६१२/३ यातील अर्धा हिस्सा प्रतिवादी क्रमांक १ यास दिल्याचे दिसून येते. तक्त्यावरून प्रस्तुत मिळकतीचा सध्याचा गट क्रमांक १४९ असल्याचे दिसून येते. तसेच, गट क्रमांक ५९१/५ या

मिळकतीतील अर्धा हिस्सा प्रतिवादी क्रमांक १ यास देण्यात आल्याचे दिसून येते. वाडी विभाजन तक्त्याप्रमाणे या मिळकतीचा सध्याचा गट क्रमांक १२७ आहे. या कब्जेपट्टीप्रमाणे प्रत्यक्ष कब्जा दिल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. तसेच, कब्जे पट्टी दिनांक ३०.०३.१९८२ रोजी करणेत आलेली आहे.

३९. प्रस्तुत कब्जे पट्टीवरून असे दिसून येते की, गट क्रमांक ११६ व १५१ मध्ये संपूर्ण क्षेत्र व गट क्रमांक १४९ व १२७ मध्ये अर्धे क्षेत्र प्रतिवादी क्रमांक १ च्या वहिवाटीला दिलेले आहेत. वादीने दाखल केलेल्या सात बारा वरील नोंदी पाहिल्या असता गट क्रमांक ११६ संपूर्ण क्षेत्रावर प्रतिवादी क्रमांक १ व २ चे खरेदीदार म्हणून आकाश काळे, गहिनीनाथ काळे, प्रकाश महानवर व काशिनाथ महानवर यांची कब्जे वहिवाट असल्याचे दिसून येते. गट क्रमांक १५१ च्या सात बाराच्या उता—यावरून संपूर्ण क्षेत्रावर वादी केशव व प्रतिवादी प्रमोद यांची वहिवाट असल्याचे दिसून येते. गट क्रमांक १४९ च्या उता—यावरून वादी केशव याची सहा आणे, आठ पै, प्रतिवादी प्रमोद व कृष्णा यांची अनुक्रमे तिन आणे, दहा पै व सहा आणे एक पै या क्षेत्रास वहिवाट असल्याचे दिसून येते. गट क्रमांक १२७ च्या मालकी हक्कात देवस्थान व इतर हक्कात कुळ म्हणून वादी केशव आठ आणे व प्रतिवादी कृष्णा आठ आणे अशी नोंद असल्याचे दिसून येते. प्रस्तुत सात बारावरील नोंदी या महसुल विभागाने घेतलेल्या आहेत. या नोंदीमधून दिनांक ३०.०३.१९८२ रोजीच्या कब्जे पट्टीस दुजोरा मिळतो. त्यामुळे अशा प्रकारे नोंदी आहेत व कब्जे वहिवाटी आहेत, ही बाब स्पष्ट होते.

४०. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी प्रतिवादी क्रमांक ३ ते ८ यांना करून दिलेल्या खरेदीखताची प्रथमदर्शनी कायदेशीर मुल्य काय आहेत हे पाहणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा गट क्रमांक ११६ म्हणजे जुना गट क्रमांक ६११ हा प्रतिवादी क्रमांक १ याला कब्जे पट्टीने प्राप्त झाला होता. त्यातील आठ आणे हिस्सा प्रतिवादी क्रमांक १ याने अर्ज देवून फेरफार क्रमांक १८३ ने प्रतिवादी क्रमांक २ यास हस्तांतरीत केलेला आहे. अशा प्रकारे दोघे प्रत्येकी आठ आणे हिश्याचे मालक झाल्यानंतर त्यांनी दोघांनी मिळून संपूर्ण सोळा आणे हिस्सा प्रतिवादी क्रमांक ३ ते ८ यांना विक्री केलेला आहे. परंतु, यातील प्रतिवादी क्रमांक २ यास मालकी

हस्तांतरीत होत असताना कोणताही दस्त झालेला नाही. केवळ अर्जावरून शंभर रूपये पेक्षा जास्त मुल्ये असलेली मिळकत प्रतिवादी क्रमांक २ च्या लाभात हस्तांतरीत झालेली आहे. त्यामुळे या मिळकतीत त्यास कायदेशीर हक्क प्राप्त होवू शकत नाहीत व त्यामुळे प्रतिवादी क्रमांक ३ ते ८ यांना देखील प्रथमदर्शनी कायदेशीर मालकी प्राप्त होवू शकत नाही, ही बाब स्पष्ट होते.

४१. वादीचे विद्वान वकील श्री. मदने यांनी आपल्या कथनाच्या पुष्ठयर्थ आपला भर आदरणीय मुंबई उच्च न्यायालयाच्या ***बबन नाईक विरूध्द सौ. प्रमिला येणारे, २०११ (६), ऑल एम. आर. १५*** यावर दिलेला आहे. यात असे नमूद केले आहे की, अंतरिम मनाई हुकूमाच्या अर्जाच्या चौकशीचे वेळी केवळ कब्जा हा महत्वपूर्ण घटक असतो. प्रस्तुत न्यायनिर्णयातील तथ्यांचा प्रतिवादीच्या वकीलांनी स्विकार केलेला आहे. या बाबीचा विचार केला असता सुरूवातीला कब्जे पट्टीप्रमाणे दावा मिळकत गट क्रमांक ११६ चा कब्जा प्रतिवादी क्रमांक १ यास, त्यानंतर त्यातील अर्धा कब्जा प्रतिवादी क्रमांक २ यास व त्यानंतर संपूर्ण कब्जा प्रतिवादी क्रमांक ३ ते ८ यांना हस्तांतरीत केलेला असल्याचे दिसून येतो. अशा परिस्थितीत दावा मिळकत गट क्रमांक ११६ वर प्रतिवादी क्रमांक ३ ते ८ यांचा कब्जा दिसून येतो. त्यामुळे या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने गट क्रमांक ११६ बाबत प्रस्तुत कब्जा प्रतिवादी क्रमांक ३ ते ८ यांचा असल्याने त्यांचा कब्जा ही महत्वपूर्ण बाब ठरते.

४२. विद्वान वकील श्री. मदने यांनी आदरणीय मद्रास उच्च न्यायालयाच्या ***उन्नी विरूध्द कंची आम्मा, १८९०, सी. जे. (मद्रास) ८९*** या न्यायनिर्णयावर दिलेला आहे. यात असे नमूद केलेले आहे की, ज्या वेळी अधिकार नसलेल्या व्यक्तीमार्फत एखादे हस्तांतरण झालेले असते, त्यावेळी असल्या हस्तांतरणाबाबत ठराव मागण्याची आवश्यकता नसते. प्रस्तुत न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्रमांक २ यास व त्याच्या मार्फत झालेले हस्तांतरण अधिकार नसताना झाले आहेत, ही बाब स्पष्ट होते. त्यामुळे त्या खरेदीखताबाबत वादींनी जाहिर ठराव मागितला नाही, या बाबीचा वादीच्या प्रकरणावर परिणाम होत नाही.

४३.        विद्वान वकील श्री. मदने यांनी आपला भर आदरणीय सर्वोच्च न्यायालयाच्या ***<u>रमेश सिंग विरूध्द स्टेट ऑफ हरियाणा, ए. आय. आर. १९९६, एस. सी. ३०६६</u>*** यावर दिलेला आहे. यात असे नमूद केले आहे की, अंमलबजावणी करणा—या न्यायालयाने (Executing Court) हुकुमनाम्याबाहेर जाता कामा नये. या ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे की, दावा मिळकतीचे कब्जाचे हस्तांतरण हे यातील वादींच्या उपस्थितीत फार पूर्वी सन १९८२ साली करण्यात आलेले आहे. तसेच, प्रस्तुत अर्जाने अशा प्रकारे न्यायालय हुकूमनाम्याबाहेर गेले आहे काय ? ही बाब ठरविता येणार नाही. त्यामुळे प्रस्तुत स्थितीला वादीला या न्यायनिर्णयावर विसंबून राहता येणार नाही.

४४.        विद्वान वकील श्री. मदने यांनी आपला भर आदरणीय सर्वोच्च न्यायालयाच्या ***<u>रामलाल विरूध्द फगुआ, २००५ सि. जे. (एस. सी.) ११०९</u>*** या न्यायनिर्णयावर दिलेला आहे. यात असे नमूद केले आहे की, केवळ फेरफारामधील नोंदीवरून एखादया मिळकतीवरील एखादया व्यक्तीचा हक्क सिध्द होवू शकत नाही. निश्चितच या प्रकरणात प्रतिवादी क्रमांक २ चा दावा मिळकत ११६ वरील हक्क हा केवळ फेरफारने निर्माण झालेला आहे. त्यामुळे दावा मिळकतीवरील त्याची मालकी व प्रतिवादी क्रमांक ३ ते ८ यांची मालकी याबाबत या प्रतिवादींना हक्क प्राप्त होत नाहीत.

४५.        प्रतिवादीचे विद्वान वकील श्री. कुलकर्णी यांनी आपला भर आदरणीय मुंबई उच्च न्यायालयाच्या ***<u>रथीराम कुंडलीक खेडेकर वि. कुंडलीक अर्जुन खेडेकर, ए. आय. आर. १९८२, मुंबई ७९</u>*** यावर दिलेला आहे. प्रस्तुत न्यायनिर्णयात नमूद केलेल्या मुद्यावर त्यांनी आपला भर आदरणीय ओरिसा उच्च न्यायालयाच्या ***<u>जेम्मा विरूध्द राघू, ए. आय. आर. १९७७, ओरिसा १२</u>*** यावर दिलेला आहे. यात असे नमूद केले आहे की, ज्यावेळी दावा मिळकत वादीच्या कब्जात नसते त्यावेळी त्याला मनाई हुकूम मागण्याचा अधिकार नसतो. प्रस्तुत दाव्यातील दावा मिळकतींचा विचार केला असता दावा मिळकत ११६ वादीच्या कब्जात नाही, ही बाब स्पष्ट होते. त्यामुळे वादीला या मिळकतीबाबत मनाई हुकूम मागण्याचा अधिकार नाही. त्याचप्रमाणे गट क्रमांक १५१, १४९ व १२७ मध्ये

वादींची काही हिश्यावर कब्जा आहे, ही बाब स्पष्ट होत असल्याने त्याबाबत मनाई हुकूम मागण्याचा वादींना अधिकार आहे.

४६.　वरील प्रमाणे विवेचनावरून दावा मिळकत गट क्रमांक ११६ यावर वादीचा कब्जा नसल्याने त्याबाबतच्या कब्जाबाबत मनाई हुकूम न दिल्यास वादीचे नुकसान होणार नाही. त्यामुळे न्यायाचा समतोल वादीचे बाजूने नाही. परंतु, अशा प्रकारे गट क्रमांक १५१, १४९ व १२७ मधील काही हिश्यातील कब्जा बाबत मनाई हुकूम न दिल्यास वादीचे नुकसान होणार आहे. त्यामुळे तो या मिळकतीमधील कब्जाबाबतच्या अंतरिम मनाई हुकूमाच्या दादीस पात्र आहे.

४७.　वादीने प्रतिवादींना दावा मिळकतीच्या विक्रीपासून प्रतिबंधीत करण्याबाबत मागणी केलेली आहे. दावा गट क्रमांक १२७ ही कोणत्याही प्रतिवादीच्या नावावर मालकी हक्कात नमूद नाही. त्यामुळे या मिळकतीचे हस्तांतरण प्रतिवादीमार्फत होण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. दावा मिळकत गट क्रमांक १४९ व १५१ यावर वादी व प्रतिवादी क्रमांक १ व २ यांचा प्रत्येकी स्वतंत्र हिस्सा नमूद केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक १ व २ यांना स्वतंत्र हिश्याची विक्री करण्यापासून प्रतिबंध करता येणार नाही. यातील गट क्रमांक ११६ याची मालकी प्रतिवादी क्रमांक १ कडून २ ला केवळ फेरफार ने हस्तांतरीत झालेली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक १ व २ यांचे कडून प्रतिवादी क्रमांक ३ ते ८ यांना झालेले हस्तांतरण देखील प्रतिवादी क्रमांक २ ला हक्क नसताना झालेले आहे, असे प्रथमदर्शनी दिसून येते. त्या बाबतच्या कब्जे पट्टीबाबत वादींनी वाद उपस्थित केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक ३ ते ८ यांनी दाव्याचा निकाल लागेपर्यंत दावा मिळकती गट क्रमांक ११६ चे हस्तांतरण करू नये असा मनाई हुकूम देणे योग्य होईल. अशा प्रकारे मी मुद्दा क्रमांक १ ते ३ उत्तर अंशतः होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४ करीता.</u>**

४८.　वरील विवेचनावरून मी प्रस्तुत मुद्याच्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे

आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश.</u>**

१. अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रमांक ३ ते ८ यांनी प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत दावा मिळकती गट क्रमांक ११६ चे कोणालाही कोणत्याही मार्गाने हस्तांतरण करू नये असा अंतरिम मनाई हुकूम देण्यात येतो.

३. प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी वादीच्या दावा मिळकत गट क्रमांक १४९, १५१ व १२७ वरील क्षेत्रावरील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करू नये असा अंतरिम मनाई हुकूम देण्यात येतो.

४. अर्ज अंशत: मंजूर करणेत आल्याने पक्षकारांनी आपआपला खर्च सोसावा.

( सं. सो. देशमुख )

दिनांक २०.०९.२०१७		दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दहिवडी.